# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:- १७/११/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

### शहरात २० नोव्हेंबर पासून संयुक्त कुष्ठ रुग्ण व क्षय रुग्ण शोध मोहीम.

आज दिनांक १७/११/२०२३ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २०/११/२०२३ पासून सुरु होणा-या संयुक्त कुष्ठ व क्षय रुग्ण शोध मोहीम अंतर्गत समन्वय सभा आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस डॉ. मोहिनी धर्मा वैद्यकीय आरोग्य अधिकारी उ.म.पा. डॉ. मोरे, सहाय्यक जिल्हा-शल्य चिकित्सक, मध्यवर्ती रुग्णालय, डॉ. अनिता सपकाळे out reach RMO, मध्यवर्ती रुग्णालय, डॉ. रत्नमाला नांदगाये शहर क्षयरोग अधिकारी, डॉ. नाईक वै. अ. सूलू व नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

सदर मोहीमेचे उद्दीष्ट ही तळा-गाळात लोकांपर्यत पोहचुन लवकरात लवकर कुष्ठ व क्षय रुग्ण शोधणे व त्यांना उपचारावर आणून संसर्गाची साखळी खंडीत करणे असे आहे.

सदर मोहीमे दरम्यान १,७२,००० लोक संख्ये पर्यत पोहचून त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करूण देणे व कुष्ठ रुग्ण व क्षय रुग्ण संदर्भात जनजागृती निर्माण करणे करीता घरो घरी आरोग्य पथक नियोजित केलेल्या भागामध्ये दिनांक २०/११/२०२३ पासून जाणार आहे.

तरी वैद्यकीय आरोग्य विभाग उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे येणा-या आरोग्य पथकास सहकार्य करावे असे आवाहन मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कुष्ठ रोगाची लक्षणे | अ.क्र. | क्षय रोगाची लक्षणे |
|---|---|---|---|
| १. | न खाजणारा, न दुःखनारा बधिर चट्टा | १. | दोन आठवड्या पेक्षा जास्त खोकला |
| २. | मज्जा जाड आणि दुःख-या | २. | दोन आठवडया पेक्षा अधिक कालावधीचा ताप किंवा मधुमेह, HIV, बाधित किंवा पुर्वी कधीही क्षय रुग्णांचे उपचार घेतल्यास एक दिवसांचा खोकला असेल तरी तपासून घेणे. |
| ३. | पाय हातांची विकृती | ३. | वजनात लक्षणीय घट |

वरील प्रमाणे लक्षणे आढळल्यास त्वरीत नजीकच्या शासकीय आरोग्य संस्थेस भेट द्यावी.

छाया प्रकाश डांगळे
माहिती व जनसंपर्क विभाग
उल्हासनगर महानगरपालिका